## प्रकाशगड येथे वोकहार्ट हॉस्पिटलचे विद्यमाने आर्थोपेडिक्स संबंधित व्याख्यान व तपासणी शिबिर

महानिर्मिती व विख्यात वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने प्रकाशगड, मुख्यालयात येथे दिनांक १६ एप्रिल रोजी 'आर्थोपेडिक्स' विषया संबंधित महत्वपूर्ण व्याख्यान व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वोक्हार्ट हॉस्पिटलचे डॉ.सचिन भोसले यांनी उपस्थितांना सांधेदुखी, विविध हांडाचे विकार याविषयी महत्वाची माहिती स्लाईड-शो सादरीकरणा द्वारे दिली.

महानिर्मितीतर्फे मुख्यालयात प्रथमच अशा प्रकारच्या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास व्यासपीठावर महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री.गुलाबसिंग गिरासे, संचालक (संचलन) मा.श्री.मधुकर शेलार, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) मा.श्री.अरविंद चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. याप्रसंगी वोक्हार्ट हॉस्पिटलचे डॉ.भोसले व त्यांचा चमू यांचेही स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस आपल्या प्रास्ताविकात कु.भारती भाटिया (सह संचालक मा.सं.) यांनी सदर शिबीराच्या आयोजना मागील भूमिका प्रकट केली. यानंतर डॉ.सचिन भोसले यांनी सुगम भाषेत उपस्थितांशी संवाद साधत हाडांचे विकार, बोन डेन्सिटोमेट्री, ऑर्थायसिस, संधीवात, मणक्यांचे आजार यांविषयी सचित्र माहिती दिली. हे विकार व त्यामागील कारणांची मीमांसा तसेच उपचार पद्धती यांचाही उहापोह त्यांनी या प्रसंगी केला. योग्य आहार, व्हिटॅमिन 'डी' चे महत्व, वजन नियंत्रण, नियमित व्यायाम या बाबींवर त्यांनी याप्रसंगी जोर दिला. महानिर्मितीच्या अधिकृत सूचीवरील 'वोक्हार्ट हॉस्पिटल' या अल्ट्रा मॉडर्न हॉस्पिटलमध्ये आर्थोपेडिक्सच्या सर्व विकारांवर आधुनिक उपचारपद्धती उपलब्ध आहेत अशी माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.

यांनतर उपस्थितांची 'प्रश्नोत्तरांच्या' माध्ययमातून संवाद साधताना डॉ.भोसले यांनी श्रोत्यांचे शंकानिरसन तसेच विविध समजुती. गैरसमजुती यांवर प्रकाशझोत टाकला. याप्रसंगी टाचदुखी, फ्रोजन शोलर, जॉगिंग, गुडघ्यात पाणी, गळपट्ट्याचा वापर, हाडे मोडणे इ. शी निगडित प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी संचालक मा.श्री.शेलार यांनी असा उपक्रम राबविल्याबद्दल मानव संसाधन विभागाचे अभिनंदन केले आणि आजच्या या कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा उपस्थितांनी पुरेपुर उपयोग करावा असे आवाहन केले.संपूर्ण कार्यक्रमाचे समर्पक सूत्रसंचालन श्री.संजय अस्वले, औद्योगिक संबंध अधिकारी यांनी केले. आभार प्रदर्शन सौ.भोसले यांनी केले.यानंतर मुख्यालयातील महानिर्मिती व महावितरणच्या सुमारे ३०० हून अधिक अधिकारी कर्मचाऱ्यांची बोनडेन्सिटी चाचणी घेण्यात आली.



बोनडेन्सिटी तपासणी अंतर्गत तपासणी करून घेताना
कार्यकारी संचालक (सं.व.सु.-१) मा.श्री.चंद्रकांत थोटवे.

## दीपनगर येथे म. जोतिबा फुले व डॉ. बाबा साहेब आंबेडकर जयंती उत्सव संपन्न

दीपनगर नविन क्लब येथे दिनांक ०१.०४.२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली म.फुले यांचे जयंती अभिवादन सभा घेवून संपन्न झाली. महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेस सुरवात करण्यात आली. सदर सभेस कु.सुनिता सावरकर या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या विद्यार्थीनीने आपल्या ओघवत्या शैलीत मार्गदर्शन करून ज्योतिबांनी स्त्रीशिक्षणासाठी कसे अहोरात्र कष्ट सोसले हे सांगून स्त्री शिकली तर ती घराला तर शिक्षित करतेच पण येणाऱ्या पिढींनाही शिक्षीत करते हे सांगितले. मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले यांनी समाजातील अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानाची ज्योत लावली आणि त्यामुळे समाज शिकू लागला व समाजातील अनिष्ट प्रथा मोडीत काढण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असे सांगितले.

दिनांक १२.०४.२००९ ते १३.०४.२००९ असे दोन दिवस अभिरूची महिला मंडल दीपनगर तसेच श्री.ए.एन. बनकर, कार्यकारी अभियंता व वि.एन. मुघल, सहाय्यक अभियंता यांनी विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करून उत्कृष्ट संचालन केले. सदर क्रीडा स्पर्धात महिला, मुले व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेवून पारितोषिके पटकावली मा.मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवून सर्वांचा गौरव करण्यात आला.

दिनांक १४.०४.२००९ रोजी नविन क्लब येथे सकाळी ०९.०० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील व मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प) श्री.जी.आर. पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत पंचशिल ध्वजारोहण करून मा.फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन सभा घेण्यात आली. सदर सभेत कविवर्य भाऊ पंचभाई, नागपूर यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. बाबासाहेबांनी अथक परिश्रमातून सामाजिक परिवर्तनाचा जो रथ आजच्या परिस्थितीत आणून ठेवला आहे तो मागे जावू न देण्यासाठी त्याचा वैचारिक वारसा पुढे चालविला पाहिजे असे आवाहन केले. मुख्य महाव्यवस्थापक श्री.जी.आर. पाटील यांनी आपल्या यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री.व्ही.एस. पाटील, महाव्यवस्थापक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेबांनी अत्यंत हालअपेष्टातून व वैचारिक संघर्षातून माणसाचे मानसिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी जो संघर्ष केला तो नविन पिढीने विसरू नये असे आवाहन केले.

सदर सभेचे सुत्रसंचलन श्री.ए.पी.शिंदे सचिव यांनी केले. सभेस श्री.व्ही.एस. पाटील, मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक गट्टेवार, देवतारे तसेच अधीक्षक अभियंता सर्व श्री.खाडीलकर, जाधव, चंद्रागडे, बुर्डे, देशमाने, खोब्रागडे, सी.आर. पाटील, आस्थापना अधिकारी श्री.जाधव, कार्यकारी अभियंता सर्वश्री.बागडे, बनकर, हरणे, सुरक्षा अधिकारी श्री.हेमाडे, सर्व विभाग प्रमुख, सर्व संघटना प्रतिनिधी, उत्सव समिती कार्यकारणी व सभासद कामगार, अभियंते व वसाहतीमधील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. महिलांची देखील लक्षणीय उपस्थिती होती.



भुसावळ औ.वि. केंद्राच्या संकेत स्थळाचे उद्घाटन करताना मा.श्री. विजय पाटील.